International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.2 Nov – Dec 2021

# कोरोना काळातील कामगारांचे प्रश्न

**डॉ. मोहन लोंढे**

मराठी विभाग प्रमुख

पद्मभुषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि. सांगली.

कोरोना या संकटाने संपूर्ण जगाला संकटात टाकले आहे.२०१९ च्या नोव्हेंबर पासून कोरोनाच्या संकटामुळे केवळ राज्य आणि देशातच नव्हे तर संपूर्ण जगभरात हाहाकार माजलेला आहे. चीनमधील वुहान प्रांतात कोरोनाचा पहिला रुग्ण सापडला आणि अल्पावधीतच संपूर्ण जगभर पसरला. आरोग्य सेवांबद्दल मोठमोठ्या वल्गना करणाऱ्या महासत्तांना सुद्धा कोरोनाने कसे जेरीस आणले ते साऱ्या जगाने पाहिले. कोरोनामुळे किती विदारक परिस्थिती निर्माण सुरू झालेली आहे, हे गेल्या दीड दोन वर्षांमध्ये संपूर्ण जगाला कळून चुकले आहे. कोरोनाच्या या आपत्ती मुळे सर्वच उद्योगधंद्यांवर, अर्थव्यवस्थेवर आणि आरोग्य व्यवस्थेवर मोठा परिणाम झालेला आहे. उद्योगधंदे मोडकळीस आले. लघुउद्योजक तर रस्त्यावरच आलेले आहेत. देशाची आणि जगाची अर्थव्यवस्था कमकुवत बनली आहे. अशा काळामध्ये ज्यांच्याकडे संसाधने आहेत, ज्यांच्याकडे महागडी आरोग्य सेवा घेण्यासाठी पैसा आहे, अशा लोकांनाच या काळात वेगवेगळ्या चांगल्या सेवा मिळाल्या. परंतु सर्वसामान्य मजूर ,कामगार, कष्टकरी यांच्या जीवनामध्ये हाहाकार माजला.हाताला काम नसल्यामुळे त्यामुळे त्यांच्या अक्षरशः जीवन-मरणाचा प्रश्न उभा राहिला. यामुळेच कोरोनाकाळातील कामगारांच्या जीवनाकडे अतिशय संवेदनशीलपणे बघणे गरजेचे आहे.सरकारी माहिती आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती याचाही वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्याची गरज आहे. प्रस्तुत शोधनिबंधात 'कोरोना काळातील कामगारांचे प्रश्न' या संदर्भाने अभ्यास मांडला जाणार आहे.

**कामगार संकल्पना व व्याख्या :**

कामगार या संकल्पनेबद्दल अनेकविध विचारवंतांनी विविध मते मांडलेली आहेत. जो कष्ट करतो, घाम गाळतो तो कामगार असाच त्यातून सार काढता येतो. औद्योगिक अथवा कोणत्याही सेवा क्षेत्रात आपल्या सेवांच्या बदल्यात जो मोबदला मिळवतो त्याला कामगार असे सर्वसाधारणपणे म्हटले

जाते. परंतु कामगार हा नेहमीच मालकांसाठी काम करत असल्याचेही या अर्था मध्ये समाविष्ट आहे. कामगार दुसऱ्याकडे काम करतो आणि त्याच्या बदल्यांमध्ये काही विशिष्ट मोबदला घेतो. अर्थात हा मोबदला त्यांना समाधानकारक मिळतोच असे नाही. त्यामुळे कामगारांचे शोषण होत असते.

**कामगार या शब्दाच्या व्याख्या:**

**१.** अ.जी.मुखेडकर "कोणत्याही निर्मिती प्रक्रियेत अथवा निर्मिती प्रक्रियेसाठी उपयोगात आणलेल्या यंत्रसामग्रीचा किंवा परिवस्तूचा कोणताही भाग साफ करण्याच्या कामी किंवा निर्मिती प्रक्रियेशी अनुषंगिक कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी प्रत्यक्ष किंवा कंत्राटदारा मार्फत कोणत्याही यंत्रणेद्वारे किंवा यंत्रणेमार्फत प्रमुख नियोक्त्याच्या कळत व नकळत कामावर लावलेली व्यक्ती म्हणजे कामगार होय." (मुखेडकर, २००५, पृ. २६१)

**२.** शरदचंद्र गोखले -"जे कामगार उत्पादनांमध्ये शेती अथवा शेतमजूर म्हणून काम करतात किंवा जे दुकाने, व्यापारी संस्था, औद्योगिक संस्था यात नोकरी करतात त्यांना श्रमकरी किंवा कामगार म्हणावे ." (गोखले, १९७६, पृ. ३८)

**३.** बाबासाहेब आंबेडकर – "ज्याचे शोषण होते त्या वर्गाला कामगार म्हटले जाते.जो काम करतो असा तो शेतकरी व कामकरी कामगार असतो" (आंबेडकर, १९३० पृ. १)

**कोरोना काळातील कामगारांचे प्रश्न:**

कोरोना काळात कामगारांच्या जीवनावर आणि त्यांच्या जीवन व्यवहारावर फारच दूरगामी परिणाम झालेले आहेत.त्यांची कुटुंबेच्या कुटुंबे अडचणींशी सामना करत असताना दिसत आहेत. या काळात कामगार पूर्णतः उद्ध्वस्त झाल्याचे चित्र संपूर्ण राज्यात आणि देशांमध्ये दिसत आहे. याच्या पुष्ट्यर्थ काही महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे गरजेचे वाटते.

**१. बेरोजगारी:** नोव्हेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान प्रांतात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला. अगदी अल्पावधीतच या विषाणूने संपूर्ण जग व्यापून टाकले. संसर्गाची साखळी तोडण्यासाठी टाळेबंदीचा उपाय काही देशांनी अवलंबला होता. भारताने हाच मार्ग अनुसरला. मार्च २०२० च्या शेवटच्या आठवड्यात भारताच्या प्रधानमंत्र्यांनी अचानक टाळेबंदीचा निर्णय घोषित केला. अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे सारा देश ठप्प झाला.याचे दूरगामी परिणाम सर्वच घटकांवर झाले. भारतातील कामगार हा तर या काळात भरडून निघालेला आहे. त्यामुळे हातावर पोट असणाऱ्या या गरीब ,मजूर

,कष्टकरी कामगारांना आपल्या टाळेबंदीच्या काळातील भविष्याबद्दल कोणतेही नियोजन करता आले नाही. अचानकपणे टाळेबंदी घोषित केल्यामुळे जीवनावश्यक वस्तू साठवण्यात अडचणी आल्या. जीवनावश्यक वस्तूंची साठवणूक करता आली नाही. आर्थिक नियोजन ही कोलमडून गेले. टाळेबंदीत अडकल्यामुळे कामगारांचे हक्काचे काम गेले.आपल्या देशामध्ये स्पष्टपणे दोन वर्ग जाणवतात ते कामगार आणि धनिक. अर्थातच हातावरचे पोट असणाऱ्या कामगारांना या काळात बेरोजगारीशी मोठा सामना करावा लागला. त्यांच्या हक्काचे काम होते तेच या टाळेबंदी ने हिरावून घेतले. काम नाही म्हणजेच अर्थप्राप्ती नाही. किंवा वेतन नाही. वेतन नाही तर जगण्याचे अति गंभीर प्रश्न समोर उभे राहिले. अशा एका दोलायमान स्थितीत भारतातील कामगार वर्ग अडकला. भारतातले कामगार विषयक कायदे चांगले असले आणि कामगारांची अधिक काळजी करणारे असले तरीसुद्धा त्या कायद्याचे तंतोतंत पालन होत नाही, हीसुद्धा वस्तुस्थिती नाकारता येत नाही . त्यामुळे कामगारांना नियमित काम असतानासुद्धा त्याचा विमा, त्याचे वेतन, त्याचे कामाचे तास व त्याचे होणारे शोषण याचा परामर्श घेणे गरजेचे आहे.कोरोनापूर्व काळात आणि सध्याच्या कोरोनाच्या काळात कामगारांचा हक्काचा रोजगार हिरावला गेला आहे. या संपूर्ण वास्तवाचाही डोळसपणे अभ्यास केला तर कामगार किती शोषणातून वाटचाल करतो आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. याच काळात बेरोजगारीचा विक्रमी दर भारतामध्ये नोंदविला गेलेला आहे . "तुम्ही बेरोजगारीचे आकडे पाहिले तर गेल्या ४५ वर्षातील सर्वाधिक आहे." (तारेंद्र, २०२०, न्यूज)

यावरुन बेरोजगारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कामगारांवर त्याचा मोठा परिणाम झाला असल्याचे दिसत आहे.

**२.स्थलांतर:** कोरोना काळामध्ये टाळेबंदी जाहीर केल्यानंतर ती किती दिवसापर्यंत असेल याबद्दल केंद्र सरकार अथवा ती ती राज्य सरकारे कमालीची गोंधळलेली होती. त्यामुळे टाळेबंदी घोषित केल्यानंतर पुढील काही महिन्यांचे कोणतेही नियोजन केंद्र वा राज्य सरकारकडे नसल्याचे स्पष्टपणे दिसून आले. त्यामुळे ग्रामीण भागातून अथवा आपल्या गावाकडून शहराकडे किंवा महानगराकडे कामासाठी गेलेला हा कामगार वर्ग आतून-बाहेरून पूर्णपणे खचला आणि हादरून गेला. शहरांमध्ये काम नसताना उपासमार होण्यापेक्षा आपण आपल्या गावाकडे जावे, असा तात्कालिक व्यावहारिक विचार करून हा कामगार वर्ग आपल्या कुटुंबासह गावाकडे मिळेल त्या वाहनाने अथवा चालत निघाला. रेल्वे किंवा बस सेवा उपलब्ध करून देण्याच्या अफवा पुढे आल्या आणि हे कामगार मोठ्या संख्येने रेल्वे व बस स्थानकावर जमा झाले. अफवांवर विश्वास ठेवून गर्दी जमा झाल्यामुळेही कोरोना चा प्रादुर्भाव होण्यास

मदतच झाली. केंद्र सरकारने किंवा राज्य सरकारने कोणतेही नियोजन न केल्यामुळे हे कामगार आपल्या कुटुंबासहित यामध्ये वृद्ध, स्त्रिया आणि लहान मुले यांच्यासह मिळेल त्या वाहनाने आपले गाव गाठण्याचा प्रयत्न करू लागले. जीवावर उदार होऊन ही सगळी मंडळी आपले गाव जवळ करू लागली. " स्थलांतराचा प्रश्न भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.शहरातील मजूर मोठ्या प्रमाणावर गावाकडे जात आहेत.भारत देशाच्या फाळणीनंतरचे हे सगळ्यात मोठे स्थलांतर आहे." (मोटे, २०२०, पृ. २४) हे अगदी खरेआहे.या दरम्यान कामगारांच्या कुटुंबाचे प्रचंड मोठे हाल झाले. काम बंद त्यामुळे उपासमार ,पगार नाही आणि त्यात कोरोनाचे भयावह संकट अशा अवस्थेत ही मंडळी शहराकडून गावाकडे निघाली. याच दरम्यान वृद्धांचे बळी गेले. गरोदर स्त्रियांची प्रसूती रस्त्यावरच झाली. तर लहान मुलांचे अतोनात हाल झाले.चांगली आरोग्य सेवा या कामगारांना व स्थलांतरित मजुरांना मिळालीच नाही. फक्त जीव वाचवण्याकरता गाव जवळ करणे एवढेच ध्येय समोर ठेवून ही मंडळी चालत, सायकलवरून, रिक्षातून, टेम्पोतून, ट्रकमधून आपल्या गावाकडे गेली.स्थलांताराचा मोठा परिणाम कामगार वर्गावरा झाला. स्थलांतरामुळे कामगारांची चणचण भासली व त्यांचा परिणाम विविध क्षेत्रावर झाला.

**३. उपासमार:** कोरोना काळात कामगारांचे काम गेले. त्यांना पुन्हा रिव्हर्स मायग्रेशन करावे लागले. त्यामुळे त्यांची प्रचंड उपासमार झाली. आणि त्यांचे आर्थिक गणित पूर्णतः बिघडून गेल्याचे दिसून आले.अजूनही याबाबतीत स्थिती फारशी समाधानकारक असल्याचे दिसत नाही.या काळातील कामगारांच्या वेतनाबाबत राज्य व केंद्र सरकारने एकवाक्यता ठेवून कोणताही ठोस तोडगा काढला नाही.त्यामुळे बडे भांडवलदार आणि मोठे उद्योजक की ज्यांच्याकडे हे कामगार काम करत होते त्यांच्यावर कामगारांच्या काळजीबाबत कोणतेही बंधन राहिले नाही.कामगारांचे प्रचंड आणि अतोनात हाल झाले.सरकारने तर पुर्णपणे दुर्लक्ष केले, आणि त्यात मालकांनी आपली जबाबदारी झटकली. अशा अवस्थेमध्ये या कामगारांनी न्याय मागायचा तरी कुठे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आणि त्यामुळे अशा प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करणाऱ्या कामगारांवर उपासमारीची वेळ आली.कर्जाचे हफ्ते थकले.

**४.आरोग्य व शिक्षण:** कोरोना काळात कामगारांच्या कुटुंबाचा आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे . भारतात आरोग्य सुविधांचीवानवा दिसत असताना ओरोग्य सेवेबाबत आपली व्यवस्था किती तोकडी होती, हे कोरोना काळात स्पष्ट झालेले आहे . "औद्योगिक वसाहतीमध्ये कोविड सेंटरची उभारणी केली नसल्याने अन्य सेंटरवर ताण येत आहे." (दैनिक प्रभात, २०२०) त्यामुळे या काळात

कोरोना व कोरोना व्यतिरिक्त इतर आजारांच्या रुग्णांना उपचार मिळण्यामध्ये व महागडी औषधे घेण्यामध्ये फार त्रास सहन करावा लागलेला आहे. कामगार वर्गाची यामध्ये फार मोठी हानी झालेली आहे. अनेक कामगारांच्या कुटुंबातल्या व्यक्तींचा मृत्यू झाल्याचेही चित्र स्पष्टपणे पुढे आलेले आहे. म्हणजेच आरोग्य व्यवस्थेकडे कल्याणकारी राज्याने दुर्लक्ष केल्यामुळे आणि आर्थिक स्थिती कोलमडलेल्या स्थितीत असताना दुसऱ्या बाजूला मुलांच्या शिक्षणावर ही दुरगामी आणि गंभीर परिणाम झालेले आहेत. ऑनलाईन शिक्षणाचा एक नवा प्रयोग या काळामध्ये सुरू झाल्यामुळे ज्यांच्याकडे अँड्रॉइड मोबाईल नाहीत, अशा मुलांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागले आहे. कामगारांच्या काही मुलांनीतर आत्महत्येचा ही मार्ग स्वीकारलेला आहे. म्हणजे ही किशोरावस्थेततील पिढी नैराश्येमध्ये व गरिबीच्या न्यूनगंडयामध्ये जगताना दिसते आहे. बालमनावर या सगळया गोष्टींचा प्रचंड मोठा परिणाम झालेला आहे. एकूणच निकोप समाजाच्या दृष्टिकोनातून हे वास्तव अत्यंत गंभीर आहे. याकडे सरकारने वेळीच संवेदनशीलपणे लक्ष देण्याची गरज आहे.

**५. सरकारची धोरणे आणि कामगारांचे शोषण:** कोरोना काळात कामगारांचे मोठे हाल झाले आहेत. गतवर्षी कोरोनाची महामारी सुरु झाली. पहिल्या लाटेमध्ये कोरोनाने अनेकांचे बळी घेतले. कोरोनानिमित्त सरकारने टाळेबंदी जाहीर केली होती. त्या टाळेबंदीमुळेलाखो कामगार बेरोजगार झाले. काही कामगार गावी जाताना उपासमारीने मेले, तर काही जणांनी आत्महत्या करणे पसंत केले. कोरोनामुळे लघुउद्योजक, व्यावसायिक, कामगार बेरोजगार झाले आणि देशाची आर्थिक दुर्दशेकडे सुरुवात झाली. टाळेबंदी आवश्यक होती. परंतु टाळेबंदी अचानक न करता त्यापूर्वी पंधरा दिवस कामगारांना स्थलांतर करण्यासाठी दिले असते तर जास्त प्रमाणात हकनाक मृत्यू झाले नसते. टाळेबंदी करताना केंद्र सरकारने पुरेसे नियोजन केले नव्हते. तसेच कोरोना किती काळ राहणार आहे, हे निश्चित नव्हते. कोरोनाचा अनुभव जगातील सर्व देशांना प्रथमच येत होता. त्यामुळे नियोजन करणे अनेक देशांना जमले नव्हते. जानेवारीत पुन्हा कोरोनाचा दुसरा म्युटेंट (कोरोनाच्या रचनेतील बदल ) आला. तो फार घातक होता. त्यामुळे टाळेबंदी सुरु केली आहे. अशा टाळेबंदीमुळे कामगार वर्गाचे जिणे हलाखीचे झाले आहे. असंघटीत कामगारांचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे. ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार, घरेलू कामगार, बांधकाम कामगार असे अनेक कामगार रोजगारापासून वंचित आहेत. या कामगारांचे जगणे म्हणजे दिवसा मिळेल त्या रोजगारावर घर चालवणे. हे कामगार सध्या काय करत असतील ? कसे पोट भरत असतील ? असे अनेक प्रश्न मनात येतात. राज्य सरकारने अशा कामगारांच्या बँक खात्यावर काही रक्कम ठेवणार असल्याचे म्हटले आहे. असंघटीत कामगारांनी

मिळणाऱ्या रकमेचा अशा लॉकडाऊनमध्ये उपयोग केला पाहिजे, असे वाटते. कारण कोरोनासारखे असे अनेक रोग, महामारी भवितव्यात येण्याची शक्यता आहे. ज्या कामगारांना पेन्शन, फंड मिळत नाही, त्यांनी भवितव्याची सोय करणे, त्याचे नियोजन केले पाहिजे. केंद्रीय कामगार-रोजगार मंत्री संतोष गंगवार यांनी लोकसभेत व्यावसायिक सुरक्षा (आरोग्य आणि कार्यकारी ) संहिता २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि औद्योगिक संबंध संहिता २०२० मध्ये कामगार कायद्यात व्यापक सुधारणांसाठीची तीन विधेयके मांडली होती. केंद्र सरकार लवकरच कर्मचाऱ्यांचे अधिकार कमी करण्यासाठीचे विधेयक संसदेत मंजूर करण्याच्या विचारात आहे. ज्या कंपन्यांमध्ये ३०० पेक्षा कमी कामगारांची क्षमता आहे, त्यांना सरकारच्या परवानगीशिवाय कामगारांना कमी करण्याचे स्वातंत्र्य राहणार आहे. केंद्रीय कामगार मंत्रालयाने नुकत्याच सादर केलेल्या विधेयकाद्वारे संबंधित नियमांमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. अशा प्रकारे केंद्र सरकारने कामगारांचे हक्क व अधिकार संपुष्टात आणून त्यांना व्यवस्थेचे गुलाम बनवण्याचे षडयंत्र सुरु केले आहे, असा आरोप कामगारांतून व्यक्त होत आहे. देशाच्या भवितव्यासाठी खासगीकरण, भांडवलदारांसाठी लाल गालिचे अंथरणे, त्याना झुकते माप देऊन कामगारांना देशोधडीला लावणे योग्य नसून यामुळे सर्वसामान्यांचे लोकशाहीत मिळालेले हक्क- अधिकार अबाधित राहणार नाहीत, असे दिसते. कामगारांचे हक्क व अधिकार संपुष्टात आणू केंद्र सरकारने कामगारांना पूर्वी असलेले संरक्षण कायद्याने काढून घेतले आहे. यापुढे कंत्राटी कामगार ही एक जात शिल्लक राहील असे दिसते. कामगारांना केव्हाही कामावरून काढले जाईल, अशी स्थिती आहे. कोरोनाकाळात टाळेबंदीमुळे कामगारांचे हाल झाले आहेत. घरगुती कामगार किंवा घरेलू कामगारांची जी कामे पूर्वी चालत ती आता टाळेबंदीमुळे बंद झाली आहेत. घरेलू कामावर गुजराण करणारी अनेक कुटुंबे आहेत. घरेलू कामांवर अवलंबून असणाऱ्या या कामगारांची बिकट परिस्थिती झाली आहे. तसेच जी कुटुंबे बांधकाम व्यवसायावर अवलंबून आहेत, त्यांची थोडीफार कामे सुरु आहेत. परंतु आर्थिक दैनिय अशी परिस्थिती आहे. टाळेबंदीनंतर ही परीस्थिती सुधारेल असे वाटले होते परंतु तसे काही झाले नाही. साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांनी म्हटले होते की, पृथ्वी ही शेषनागाच्या फण्यावर तरली नसून ती कामगारांच्या, शोषितांच्या तळहातावर तरली आहे. कामगारांमुळे देशाचे आर्थिक चक्र सुधारले, राष्ट्राच्या विकासामध्ये कामगारांचा मोठा वाटा आहे. अशा कामगारांचे अधपतन केंद्र सरकारने केले आहे. केंद्रीय कामगार-रोजगार मंत्री संतोष गंगवार यांनी लोकसभेत व्यावसायिक सुरक्षा (आरोग्य आणि कार्यकारी) संहिता २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि औद्योगिक संबंध संहिता २०२० मध्ये कामगार कायद्यात व्यापक

सुधारणांसाठीची तीन गतवर्षी मांडली होती. कामगार कायद्यातील बदलांमुळे विरोधकांनी, ही कामगार संबंधित विधेयके स्थायी समितीकडे अभ्यासासाठी पाठवावीत अशी मागणी केली होती. सुधारीत विधेयकांनुसार, १०० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या औद्योगिक संस्थांना सरकारच्या परवानगीशिवाय कर्मचारी भरती करण्याची आणि कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याची कंपन्यांना परवानगी देण्यात आली आहे. गेल्या वर्षी याच विधेयकाचा आराखडा तयार करून ही मर्यादा वाढवली होती. गत वर्षी देशातील कामगार संघटनांनी या विधेयकाला विरोध केला होता. सुधारीत विधेयकानुसार, कर्मचाऱ्यांना संपावर जाण्यासाठी ६० दिवस आधी नोटीस देणे बंधनकारक करण्यात आले आहे. राष्ट्रीय औद्योगिक न्यायाधिकरणात एखादा विषय प्रलंबित असेल तर कर्मचारी संप करू शकत नाहीत. कामगारांच्या अधिकाराला कात्री लावण्याचा प्रकार केंद्र सरकार करीत आहे. सध्या सहकारी संस्थामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याच्या सहा आठवडे आधी नोटीस देण्याची तरतूद होती. नोटीस दिल्यानंतर कोणताही कामगार दोन आठवयापर्यंत संपावर जाऊ शकत नाही. कॉंग्रेसने सरकारच्या या कायद्याला विरोध केला होता. केंद्रीय मंत्री संतोष गंगवार यांनी म्हटले होते की, सरकारने विविध ४४ कामगार कायदे चार कायद्यात विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे. खरे तर देशातील सर्व कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशी केंद्र सरकारने एक समिती तयार करून चर्चा केली पाहिजे होती. परंतु अशी पारदर्शकता केंद्र सरकारने दाखवलेली नाही. बहुमत आहे, म्हणून कोणताही कायदा मंजूर करून घ्यायचा आणि नागरिकांचे हक्क- अधिकार नष्ट करायचे धोरणच यातून दिसत आहे. कामगारांना त्यांच्या न्यायासाठी आंदोलने करणे, संप करण्याचा अधिकार केंद्र सरकार काढून घेत आहे, असे दिसते. तसेच कंत्राटी कामगार ही पद्धत म्हणजेच नव आर्थिक अस्पृश्यता केंद्र सरकारला आणायची आहे, असे दिसते.

केंद्र सरकारची आजपर्यंतची धोरणे पाहिली तर असे दिसून येते की, सरकार विरोधकांसमोर कोणतीही बाब स्पष्ट मांडत नाही किंवा त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत नाही. एखादे विधेयक मांडताना ते का आवश्यक आहे आणि त्यात काय नमूद केले गेले आहे, यावर विरोधकांशी चर्चा-परिसंवाद झाला पाहिजे. त्यातून जे आक्षेपार्ह वाटते, त्यावर विचार करून निर्णय घेणे अपेक्षित असताना, आम्ही घेऊ तोच निर्णय सर्वांनी मान्य करायला हवा, हा केंद्र सरकारचा अट्टाहास अनेक वेळा दिसून आला आहे. त्यामुळे सरकार आपल्यावर अनेक गोष्टी लादत आहे काय, असा एक गैरसमज सर्व सामान्यांमध्ये निर्माण होत आहे. विरोधक हे अनेक बाबींवर विरोध करणारच. परंतु त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत तर लोकशाहीतील सर्वमान्य विचारापिठाचा

वापर नेमका कशासाठी होत आहे ? असा प्रश्न निर्माण होतो. सरकार सहजपणे कोणताही कायदा मंजूर करेल आणि नागरिकांना, विरोधी पक्षांना विचारात घेणार नाही, ही बाब लोकशाहीप्रणीत भारतासाठी योग्य नव्हे. या देशात सर्वसामान्य नागरिक वा लोकप्रतिनिधी यांची बूज केंद्र सरकारने राखत सर्वांशी संपर्क साधत काही गैरसमज दूर करणे महत्वाचे आहे. म्हणजे दरवेळी केंद्र सरकारला विरोधी पक्षांना जबाबदार ठरवावे लागणार नाही आणि सरकार जनतेशी संपर्क साधून विचार विनियम करते आणि त्यावर योग्य निर्णय घेते, असा संदेश देशभर जाईल, सरकारबद्दल आदरभाव वाढेल. परंतु दुर्दैवाने असे होताना दिसत नाही. कामगारांचे व शेतकऱ्यांचे हक्क- अधिकार कमी करणारे नवीन कायदे करणे, भांडवलदारांची मक्तेदारी वाढवणे, देशात खासगी व्यवस्था निर्माण करून सार्वजनिक सेवा- सुविधा नष्ट करणे असे प्रकार केंद्र सरकार करताना दिसत आहे. यामुळे भवितव्यात सरकार नामधारी राहील आणि भांडवलदारांचे वर्चस्व देशात वाढेल, अशी भीती व्यक्त होत आहे. समारोप कोरोना काळात आरोग्य,शिक्षण,अर्थव्यवस्था, समाजस्वास्थ्य या अनुषंगाने खूप बदल आणि परिणाम झालेले आहेत.कामगारांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळली असून बेरोजगारीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.उपासमारीला व आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागत आहे,.कामगारांना आरोग्याच्या समस्या भेडसावत आहेत. स्थलांतराचा प्रश्नही पुढे आला आहे. कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नही गंभीर बनला आहे.या सर्व प्रश्नांवर सकारने उपाययोजना करण्याची गरज आहे. कामगारांसाठी असणाऱ्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या पाहिजेत. त्याचबरोबर सध्याच्या काळात कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी विशेष पॅकेजची निर्मिती केली पाहिजे.

**संदर्भ:**

१. मुखेडकर, अ.जी. (२००५) : औद्योगिक आणि कामगार कायदे, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद, पृ. २६१.
२. गोखले, शरचंद्र (१९७८) : कामगार कल्याण, श्रीविधा प्रकाशन, पुणे, पृ. ३८.
३. आंबेडकर, बाबसाहेब (१९३०) : जनता, संपादक देवराम विष्णू नाईक, मुंबई, पृ. १.
४. तारेंद्र, किशोर (७ सप्टेंबर २०२०) : बी.बी.सी न्यूज.
५. मोटे, युवराज (२०२०) : कोरोना आणि मानवी जीवन, ज्ञानज्योती कोल्हापूर, पृ २४
६. १३ सप्टेंबर (२०२०) : दैनिक प्रभात.